प्रतापगड वॉरियर्स, रायगड रॉयल्सची विजयी सलामी

समद फल्ला, मिथुन किराडची भेदक गोलंदाजी

पुणे, ता. २८ : अचूक गोलंदाजीला क्षेत्ररक्षकांकडून मिळालेल्या सुरेख साथीमुळे तिसऱ्या एमपीएल ट्वेंटी २० क्रिकेट स्पर्धेत प्रतापगड वॉरियर्सला पहिल्या सामन्यात विजयाची नोंद करता आली. पूना क्लबच्या मैदानावर बुधवारी झालेल्या निच्चांकी धावसंख्येच्या सामन्यात प्रतापगड वॉरियर्सने देवगिरी एम्परर्सचा सात गडी राखून पराभव केला.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या देवगिरी एम्परर्सचा डाव १६.४ षटकांत अवघ्या ६३ धावांतच संपुष्टात आला. समद फल्लाने पंधरा धावांत तीन गडी बाद केले. त्यानंतर प्रतापगड वॉरियर्सने ११ षटकांत ३ बाद ६४ धावा केल्या. शहजाद फकीने २३ धावांची खेळी केली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा देवगिरीचा कर्णधार चेतन सूर्यवंशीचा निर्णय त्यांच्या अंगाशी आला. फटक्यांची अतिशय चुकीची निवड करून फलंदाजांनी स्वतःहून पायावर कुऱ्हाड मारून घेतली. डावातील निम्मी षटके झाली तेव्हा त्यांचे आठ फलंदाज २५ धावांतच तंबूत परतले होते. फल्लाने आपल्या पहिल्या दोन षटकांतच सुमित चव्हाण, मंदार ढुमके आणि प्रयाग भाटी या त्यांच्या तीन प्रमुख फलंदाजांना बाद केले. त्यानंतर शेवटपर्यंत टिकून राहिलेल्या सॉलोमन चोपडेच्या नाबाद २७ धावांच्या खेळीमुळे तरी त्यांना अर्धशतक पार करता आले.

त्यानंतर स्वप्नील गुगळे आणि शहजाद फकी यांनी पाच षटकांतच ३४ धावांची सलामी देत प्रतापगडला विजयाच्या मार्गावर नेले. ही जोडी फुटल्यावर पराग मोरेने षटकार ठोकत विजयाची औपचारिकता पार पाडली.

संक्षिप्त धावफलक : देवगिरी एम्परर्स (१६.४ षटकांत) सर्वबाद ६३ (सॉलोमन चोपडे नाबाद २७, समद फल्ला ३-१५, मिथुन किराड ३-१०, संजय परदेशी २-९) **वि.वि. प्रतापगड वॉरियर्स (११ षटकांत) ३ बाद ६४** (शहजाद फकी २३, स्वप्निल गुगळे १४, पराग मोरे नाबाद ९, साजीन सुरेशनाथ २-२२)

पन्हाळा पँथर्सविरुद्ध संग्राम अतितकरचा अष्टपैलू खेळ

पुणे, ता. २८ : संग्राम अतितकरच्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर रायगड रॉयल्सने पन्हाळा पँथर्सचा सहा गडी व २० चेंडू राखून पराभव करीत तिसऱ्या कॉटनकिंग एमपीएल ट्वेंटी-२० क्रिकेट स्पर्धेत विजयी सलामी दिली. 'सामन्याचा मानकरी' अतितकरच ठरला.

डेक्कन जिमखाना मैदानावरील सकाळच्या सत्रातील या सामन्यात रायगड संघाचा कर्णधार रोहित मोटवानीने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्वीकारले. निखिल पराडकरने पहिल्याच चेंडूवर तुषार श्रीवास्तवला बाद केले. त्यानंतर दुसऱ्याच षट्कात सुनील पटेलने विनायक कुटगुटेला परतवून पन्हाळा पँथर्सला दुसरा धक्का दिला. २ बाद ३ अशा अवस्थेतून विपुल जेऊरकरने पन्हाळा पँथर्सच्या डावाला आकार दिला. त्याने २७ चेंडूंत सहा चौकार व तीन षट्कारांसह ४९ धावा केल्या. हर्षद खडीवाले पहिल्याच षट्कात बाद झाल्यानंतर कर्णधार रोहित मोटवानी व प्रवीण देसशेट्टीने दुसऱ्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी केली. प्रवीणने ३५ चेंडूंत ४६ धावा केल्या. अतितकरने २३ चेंडूंत नाबाद ३० धावा केल्या. रायगडने १६.४ षटकांत ४ बाद १२५ धावा करून विजय मिळविला.

या सामन्याचे उद्घाटन कॉटनकिंगचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौशिक मराठे यांच्या हस्ते झाले. या वेळी 'सकाळ'चे संचालक (कॉर्पोरेट डेव्हलपमेंट) उदय जाधव, महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे खजिनदार माधव रानडे आणि डेक्कन जिमखाना क्लबचे अध्यक्ष ॲड. अभय आपटे उपस्थित होते.

संक्षिप्त धावफलक : पन्हाळा पँथर्स : १९.२ षटकांत सर्व बाद १२४ (विपुल जेऊरकर ४९, सुनील पटेल ३-२६, संग्राम अतितकर २-१५, श्रीकांत मुंढे २-२७) **पराभूत विरुद्ध रायगड रॉयल्स : १६.४ षटकांत ४ बाद १२५** (प्रवीण देसशेट्टी ४६, अतितकर नाबाद ३०, अनुपम संकलेचा २-१३, मनीप देसाई २-२१).

पूना क्लब : 'कॉटनकिंग एमपीएल'मधील शिवनेरी लायन्स आणि सिंधुदुर्ग सेलर्स यांच्यातील सामन्यापूर्वी आकाशात फुगे सोडून स्पर्धेचे उद्घाटन करताना भारतीय संघाचे माजी कर्णधार चंदू बोर्डे. या वेळी (डावीकडून) अनिरुद्ध देशपांडे, ज्ञानेश लोहकरे, पांडुरंग साळगावकर, बोर्डे, राहुल ढोले-पाटील, रियाज बागवान आणि एल. एस. कृष्णन.

डेक्कन जिमखाना मैदान : कॉटनकिंगचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौशिक मराठे रायगड रॉयल्स संघाच्या खेळाडूंशी ओळख करून घेताना. या वेळी उदय जाधव, अभय आपटे उपस्थित होते.

DY DEVELOPERS MAN OF THE MATCH

समद फल्ला (प्रतापगड वॉरियर्स)

कौस्तुभ पाटील (शिवनेरी लायन्स)

गणेश गायकवाड (सिंहगड सुप्रीमोज)

संग्राम अतितकर (रायगड रॉयल्स)

एमपीएल गुणतक्ता

संघ	सामने	विजय	पराभव	अनिर्णित	गुण	निव्वळ धावगती
प्रतापगड वॉरियर्स	१	१	०	०	४	–
रायगड रॉयल्स	१	१	०	०	४	–
शिवनेरी लायन्स	१	१	०	०	४	–
सिंहगड सुप्रीमोज	१	१	०	०	४	–
तोरणा टायगर्स	१	०	१	०	०	–
सिंधुदुर्ग सेलर्स	१	०	१	०	०	–
देवगिरी एम्परर्स	१	०	१	०	०	–
पन्हाळा पँथर्स	१	०	१	०	०	–

'सिंहगड सुप्रीमोज'च्या विजयाला 'डकवर्थ-लुईस'चा आधार

पुणे, ता. २८ : पावसाने व्यत्यय आणलेल्या कॉटनकिंग महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या (एमपीएल) डेक्कन जिमखाना मैदानावरील दुसऱ्या सामन्यामध्ये सिंहगड सुप्रीमोजने 'डकवर्थ-लुईस'च्या आधारे तोरणा टायगर्स संघावर सहा धावांनी विजय मिळविला. 'तोरणा'च्या डावातील वाराव्या पटकाला जोरदार पावसाला सुरवात झाली. त्या वेळी त्यांची धावसंख्या दोन बाद ७७ होती. 'डकवर्थ लुईस'च्या समीकरणानुसार, बाराव्या पटकानंतर 'तोरणा'ला विजयासाठी ८३ धावांची गरज होती. यामुळे 'सिंहगड'ला विजयी घोषित करण्यात आले.

'सिंहगड'चा सलामीवीर अमेय श्रीखंडे दुसऱ्याच चेंडूवर बाद झाला. त्यानंतर मानसिंग निगडेही केवळ पाच धावा करून बाद झाला.

'सिंहगड'ची धावगती एक वेळ पटकामागे दोन धावा एवढीच होती. विशांत मोरे (१९ चेंडूत १६) आणि कर्णधार गणेश गायकवाड (४८ चेंडूत ७९) यांनी जोरदार प्रतिआक्रमण केले. विशाल भिलारेने ४३ चेंडूत नाबाद ४९ धावा केल्याने संघाला दीडशे धावांपर्यंत मजल मारता आली. पाऊस आल्याने 'तोरणा'ला १८ पटकांत १३४ धावांचे सुधारित लक्ष्य देण्यात आले. केदार जाधव (२५ चेंडूत ३९) आणि विराग आवटे (३५ चेंडूत नाबाद २८) यांनी 'तोरणा'ला वेगवान सुरवात करून दिली. मात्र, तीन पटकांच्या अंतरामध्ये जाधव आणि अजिंक्य जोशी बाद झाल्याचा फटका त्यांना 'डकवर्थ-लुईस'च्या समीकरणामध्ये बसला. अकराव्या पटकातील पहिल्याच चेंडूवर अजिंक्य जोशी बाद झाला. बाराव्या पटकात पावसाने जेव्हा पुन्हा हजेरी लावली.

संक्षिप्त धावफलक : सिंहगड सुप्रीमोज : २० षटकांत ५ बाद १५३ (गणेश गायकवाड ७९-४८ चेंडू, नऊ चौकार, तीन षटकार, विशांत मोरे ४२, विशाल भिलारे नाबाद ४७, परीक्षित जाधव १-२६, नासीर मोमीन १-३४, केदार जाधव १-२१) **वि. वि. (डकवर्थ लुईस) तोरणा टायगर्स : १२ षटकांत २ बाद ७७** (केदार जाधव ३९-२५ चेंडू, तीन चौकार, तीन षटकार, विराग आवटे नाबाद २८, अक्षय दरेकर १-२२, मुदस्सर मुल्ला १-३)

TITLE SPONSOR cottonking | ASSOCIATE SPONSOR INDO BATTERIES JUST SWITCH ON | MAN OF THE MATCH SPONSOR DY DEVELOPERS | MOMENT OF THE DAY SPONSOR MIT PUNE | HEALTH PARTNER ADITYA BIRLA MEMORIAL HOSPITAL HOPE · HEAL · HEALTH · HAPPINESS | BEVERAGE PARTNER Urja KUTWAL FOODS PVT. LTD. | RADIO PARTNER 98.3 FM RADIO MIRCHI It's hot! www.radiomirchi.com | OUTDOOR PARTNER Surekha Advertising Services | WEB PARTNER Dimakh Consultants | EXECUTED BY WHITE COUPLE entertainment | COMMUNICATION PARTNER SETU

सिंधुदुर्गविरुद्ध कौस्तुभ, नौशाद चमकले

पुणे, ता. २८ : शिवनेरी लायन्सने एमपीएल-३ मध्ये सिंधुदुर्ग सेलर्सवर ३८ धावांनी दणदणीत विजय मिळविला. पूना क्लबवरील सामन्यात १ बाद ८१ वरून सिंधुदुर्गचा डाव कोसळला.

कर्णधार कौस्तुभ पाटील याने नाबाद अर्धशतकी खेळी करून विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याने तरणजितसिंगसह ९३ धावांची भागीदारी रचली. यष्टिरक्षक-सलामीवीर अवधूत दांडेकरने २ बाद ७ वरून कौस्तुभला चांगली साथ दिली. त्यांनी ७३ धावांची भागीदारी करून पाया रचला.

सिंधुदुर्गच्या डावाला खिंडार पाडण्याचे काम नौशाद शेख आणि राहुल देसाई यांनी केले. सलामीवीर चेतन यादवने सर्वाधिक ३४ धावा केल्या. त्याने विक्रमांत निम्हणसह ४७ धावांची सलामी दिली, पण त्यानंतर निरंजन चव्हाणने शिवनेरीला पहिले यश मिळवून दिले. त्यानंतर चेतन-त्रिपाठी यांनी आव्हान कायम ठेवले. अकराव्या पटकात नौशादने दोघांना लागोपाठ बाद केले. त्याची हॅटट्रिक हुकली, पण हेच पटक निर्णायक ठरले. सिंधुदुर्गने मग शंभर धावांच्या आतच सहा बळी गमावले.

सामन्याचे उद्घाटन भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार चंदू बोर्डे यांच्याहस्ते झाले. यावेळी स्पर्धेचे असोसिएट स्पॉन्सरर्स इंडो बॅटरीजचे ज्ञानेश लोहकरे, सकाळचे बीझनेस हेड एल. एस. कृष्णन, पूना क्लबचे राहुल ढोले-पाटील, आदी उपस्थित होते.

संक्षिप्त धावफलक :

शिवनेरी लायन्स : २० षटकांत ३ बाद १७३ (अवधूत दांडेकर ३८- ५ चौकार, कौस्तुभ पाटील नाबाद ६१- ५२ चेंडू, ६ चौकार, तरणजितसिंग नाबाद ५३- २४ चेंडू ३ चौकार, ५ पटकार, पुष्कराज जोशी १-२२, राहुल त्रिपाठी १-१६, इम्रान सय्यद १-३०) **वि.वि. सिंधुदुर्ग सेलर्स १९.५ षटकांत सर्वबाद १३५** (विक्रांत निम्हण २१, चेतन यादव ३४, राहुल त्रिपाठी २१, नौशाद शेख ४-२२, राहुल देसाई ९-३, निरंजन चव्हाण १-१७)

दिवसाचा लक्षवेधी क्षण...

पूना क्लब : 'एमपीएल-३' ट्वेंटी-२० क्रिकेट स्पर्धेत बुधवारी शिवनेरी लायन्सचा गोलंदाज राहुल त्रिपाठीने सिंधुदुर्ग सेलर्सचा फलंदाज रोहित कपूरचा त्रिफळा उडविला.

Discovering talents and converting them into gems
MAEER ESTD 1983
MIT PUNE
MIT Group of Institutions, Pune, India
A country's strength is defined by its literacy rate !

एमपीएल फेअर प्ले ॲवॉर्ड

संघ	सामने	गुण
सिंहगड सुप्रिमोज	१	१०
तोरणा टायगर्स	१	१०
सिंधुदुर्ग सेलर्स	१	९
शिवनेरी लायन्स	१	९
प्रतापगड वॉरियर्स	१	९
पन्हाळा पँथर्स	१	८
रायगड रॉयल्स	१	८
देवगिरी एम्परर्स	१	७

Now available at a down payment of Rs. 16,999/- TVS CREDIT

FOR ALL INSTITUTIONAL/BULK REQUIREMENTS PLEASE MAIL corporatecustomersupport@tvsmotor.co.in अधिकृत विक्रेते : पुणे • वाकडेवाडी: सेंच्युरी TVS Tel: 66012847/8, 66058176 • भांडारकर रोड: सेंच्युरी TVS Tel: 25652137/1482 • पौड फाटा: छत्रपती TVS Tel: 25448586, 25468316 • चिंचवड : साई बाबा TVS Tel: 46701110/1161 • सातारा रोड: द शेलार TVS, Tel: 020-24231212, 24441480, 9970391234, • पार्वतीगांव: Tel: 24436094, 9960379733 • नगर रोड : ऋषभ TVS Tel: 26612364 / 9370799951 • बानेर रोड: वारियान TVS Tel: 27293777 / 27293888 • हड़पसर : कलमकर मोटर्स, शापॅ नं. 1, 2, 3, 4, फॉर्च्यून एस्टेट, वेस्ट ब्लॉक, इद्रप्रस्थ, आकाशवाणी जवळ Tel: 020-26509191/9292, 08888844488. तेजस TVS 1970, जन मोहमद स्ट्रीट, शिवाजी मार्केटजवळ, कँप पुणे Tel: 020-26331700 / 9960007355 • राजलक्ष्मी TVS 994, शुक्रवार पेठ, टिळक रोड, हिराबाग चौकापुढे, बीपीसीएल पुणे Tel: 020-24441010 / 9850084299, • बारामती : जे.जे. TVS Tel: 02112-223435 / 222235 • दौंड : नीलावती TVS Tel: 02117-263981, 9822440789 • सातारा: हेम TVS Tel: 232024/5/6 • फलटण: अरीहंत TVS Tel: 220701/601/221701 • अहमदनगर: भन्साळी TVS Tel: 2353756, 2327724 • शिवम् TVS Tel: 2324400 / 2322505 • श्रीरामपूर: ओबेरॉय TVS Tel: 223240/540 • संगमनेर: ओबेरॉय TVS Tel: 227137 • शिरुर: शिवम् TVS Tel: 02138-222200/9422228200. इंदापूर : राऊत एजन्सी, Tel: 02111-224296

McCann/Blr/Tvs/591/11